**महानगरपालिका अमरावती,**

महिला व बाल विकास विभाग

जा.क्र. अमनपा / मबावि / 56 / 2025

दिनांक 30 / 06 / 2025

**कोटेशन नोटीस**

महिला व बाल विकास विभाग, महानगरपालिका, अमरावती यांचे कडून खालील कामाकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्याकरीता संबंधीत कार्य करणाऱ्यांनी दरपत्रक मोहोर बंद लिफाफयामध्ये ( कोटेशन ) दि. 4 / 07 / ~~06~~ /2025 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे. प्राप्त कोटेशन शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येईल.तसेच कुठलेही कारण न देता एक किंवा सर्व कोटेशन नाकारणे , स्वीकारणे यांचे अधिकार खाली सही करणार अधिकारी यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहे.

| क्र | कामाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | महिलासाठी आरोग्य,हुंडा बंदी,स्त्रीभ्रूण हत्या - जनजागृतीपर पथनाटय कार्यक्रम करणे. | सर्व करांसह व दरांसह प्रती पथनाटय दर ,संहिता लेखन व तालीम शुल्क (एकवेळ ) यानुसार दर सादर करावे |

अटी व शर्ती :-

1. वरील कामाकरीता महाराष्ट्र शासन – सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.- मावज-2021/प्र क्र 192/का-34 ,दिनांक 14.10.2021 नुसार शासन मान्यता प्राप्त संस्थानीच दरपत्रक द्यावे. याव्यतीरीक्त व्यक्ती अथवा संस्थांचे दरपत्रक कोणत्याही स्थीतीत स्वीकारले जाणार नाही.
2. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.- मावज-2021/प्र क्र 192/का-34 ,दिनांक 14.10.2021 मधील तरतुदीनुसार कार्य करावे लागेल.
3. दरपत्रक सादर करतेवेळी संस्था / संस्थाचालक यांनी संस्था नोंदणी प्रमाणपत्र, आधारकार्ड व पॅनकार्ड जोडणे बंधनकारक राहील.
4. दर सर्व खर्च व करांसह द्यावे. ज्यात लागु असलेले सर्व शासकीय करांचा समावेश असावा. ( GST व इतर)
5. मनपा आदेशीत करेल त्या संख्येत व मुदतीत काम करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहित.
6. मनपा सुचवील त्यानुसार व ठिकाणी पथनाटय सादर करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहित.
7. दरपत्रक मंजुरीनुसार करारनामा करावा लागेल.
8. पथनाटय आयोजनाचे पुरावे सादर करावे.( जीओ टॅग फोटो/ व्हीडीओ इ.)
9. कार्य झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.
10. कोणत्याही प्रकारे अग्रीम मिळणार नाही तसेच देयक अदा होण्यास विलंब झाल्यास मनपा व्याज देणार नाही.
11. अटी असलेले दरपत्रक अपात्र असतील.
12. एक अथवा जास्त दरपत्रक स्वीकारणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे तसेच योजना राबविणे बाबातचे सर्वाधिकार मा. आयुक्त यांचेकडे अथवा प्राधीकृत अधिकारी यांचेकडे राखीव आहेत.
13. अधिक माहितीकरीता महिला व बालविकास विभाग , मनपा अमरावती येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**उपायुक्त -02**
**महानगरपालिका अमरावती**

**महिला व बाल विकास अधिकारी**
**महानगरपालिका अमरावती**

प्रतिलीपी- सिस्टीम मॅनेजर मनपा, अमरावती यांना मनपा पोर्टलवर नोटीन प्रसिद्ध करण्याकरीता